
खिसेच खिसे



डोरोथी लेविन्सन

चित्रे व सजावट: **रूथ वुड**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**






खिसेच खिसे



डोरोथी लेविन्सन

चित्रे व सजावट: **रूथ वुड**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



जोई नावाचं एक कांगारूचं पिल्लू होतं.

ते आपल्या आईच्या खिशात राहत असे.

हा खिसा खूप उबदार आणि मऊ होता

झोपायला आणि मोठं व्हायला फारच छान.



जोई तेच तर करायचा.

बहुतेक वेळा तो झोपायचा आणि मोठा व्हायचा.

पण कधी कधी तो खिशात उभा राहायचा

आणि बाहेर पहायचा.

एक दिवस जोई खिशात उभा राहून

आजूबाजूला पाहत होता.

“ते काय बरं दिसतंय?” त्याने विचारले.

“ते ना, ते आहे जग.”

त्याच्या आईने उत्तर दिले.

मग जोई जगाकडे पाहू लागला.




त्याला गवत दिसलं आणि झाडं

आणि कांगारू सुद्धा.

त्याला कांगारू उड्या मारत

असलेले दिसले.

हॉप



हॉप

हॉप

गवतावरून आणि झाडाखाली.

“मला पण जग पहायचंय,”

जोई म्हणाला.

“ते काय!” त्याची आई म्हणाली.

“सगळीकडे पहा की.”


“तसं नाही,” जोई म्हणाला.

“मला या खिशातून

बाहेर पडायचं आहे.

मला बाहेर येऊन

जग पाहायचं आहे.”



“नाही, जोई,” त्याची आई म्हणाली.

“परत खिशात बस बघू.

आणखी मोठा झालास

की मगच बाहेर यायचं.”





“आणखी मोठा! आणखी मोठा!

तू सारखी मला तेच तर सांगतेस,” जोई म्हणाला.

“बघ! मी आता किती मोठा झालो आहे.

या खिशात तर आणखी जागा सुद्धा नाही.”



“जोई!” आई रागावली.

“आता हे उड्या मारणं थांबव पाहू!

स्वस्थ बसलास तर हवी तितकी जागा आहे.”

“स्वस्थ बस! स्वस्थ बस!” जोई म्हणाला.

“तू मला सारखी तेच तर सांगतेस!

मी काय आयुष्यभर या खिशात

असा स्वस्थ बसून राहू का?”

“लवकरच तू मोठा होशील,”

आई म्हणाली.

मग तू बाहेर जा.”





“आणखी मोठा! आणखी मोठा!” जोई म्हणाला.

“पण मला आताच जग पहायचं आहे.”

“जोई,” त्याची आई म्हणाली.

“स्वस्थ बस! आणि झोप आता.”

“झोप! झोप! तू सारखी मला

तेच तर सांगतेस,” जोई म्हणाला.


“मला मुळीच झोप आली नाही आहे.”

एक दिवस जोई खिशातून

बाहेर पाहत होता.

त्याने सगळीकडे पाहिले.

त्याची आई गवत खात होती.



“आता मी या खिशातून

बाहेर पडणार आहे,”

जोईने मनाशी विचार केला.

मी अगदी आताच

बाहेर पडणार आहे!”

जोईचे पाय खिशातून बाहेर आले.

त्याची शेपटी पण बाहेर आली.

आता जोई पण बाहेर येऊन

गवतावर पडला.





"ओ, ओ!" जोई म्हणाला.

गवत मऊ नव्हतं.

पण जोई आता खुश होता.



“आता मी उड्या मारणार आहे,” तो म्हणाला.

हॉप

हॉप

जोई खाली पडला.



त्याने परत एक ऊडी मारली.


तो परत खाली पडला.

“ओ, ओ!” जोई म्हणाला.

गवत मुळीच मऊ नव्हतं.

जोईने परत एक उडी मारली.

तो परत एकदा खाली पडला.





हॉप.

हॉप.

यावेळी मात्र तो खाली पडला नाही.

त्याने परत उड्या मारल्या.

हॉप   हॉप   हॉप

गवतावर आणि झाडाखाली.





तो उड्या मारत गेला

ते त्याच्या आईला दिसलेच नाही.

ती अजून गवत खात होई.



जोईला खूप मजा येत होती.

तो इकडे तिकडे

सगळीकडे उड्या मारत होता.

जग बघायला किती मजा होती.



मग जोई खाली बसला.

तो आपल्या आईला शोधू लागला.

पण ती कुठेच दिसेना.

“मला आता खिसा हवाय,” जोई म्हणू लागला.

आता खिसा शोधण्यासाठी

जोई सगळीकडे उड्या मारू लागला.





हॉप

हॉप

हॉप

गवतावर आणि झाडाखाली.

उड्या मारत मारत तो एका शेतापाशी पोचला.



तिथे शेतकऱ्याची बायको होती.

“चला! बरं झालं!” जोई म्हणाला.

“मला एक खिसा दिसतोय.”

बायकोच्या कपड्याला एक मोठा खिसा होता.

तो उबदार आणि मऊ दिसत होता.



मग काय,

हॉप

हॉप

जोईने खिशात उडी मारली.





त्या खिशात काही तरी आहे

हे जोईला माहीतच नव्हतं.

क्रॅक! क्रॅक!

फूस! फूस!

खूस! खूस!

“ईईईई !” शेतकऱ्याची बायको किंचाळली.

हॉप ! हॉप !

जोई खिशातून बाहेर पडला.

हॉप! हॉप!

आणि उड्या मारत निघून गेला.

“हा खिसा काही छान नव्हता!”

जोई म्हणाला.





जोई परत इकडे तिकडे पाहू लागला.

त्याला एक मुलगा आणि एक मुलगी दिसले.

मुलाकडे शाळेचे मोठे दप्तर होते.



“वा! छान!” जोईला वाटले.

“मला एक खिसा दिसतोय!”

हॉप

हॉप

आणि जोईने दप्तरात उडी मारली.



“हे काय आहे?” जोई म्हणाला.

“मला हे नको आहे!”



“आणि हे काय आहे?” जोई म्हणाला.

“मला हे नको आहे

आणि हे पण नको आहे.”



“हे काय आहे बरं?” जोई म्हणाला.

“हे तर मला आवडतं,

हे पण

आणि हे सुद्धा.”



मुलगा आता बस मध्ये चढला.

आणि जोई पण!

धड धड धड.

शाळेची बस निघाली होती.

हे छान होते.

आईच्या खिशात बसून

गेल्यासारखेच वाटत होते.

जोईला छान झोप लागली.






जोई थोड्या वेळाने जागा झाला.

त्याने आजूबाजूला पहिले.

मुले आणि मुली.

मुली आणि मुले.



मग कुणीतरी म्हणाले,

“मुलांनो आणि मुलींनो,

स्वस्थ बसा बघू.”

“काय? स्वस्थ बसा? अरे बापरे!

आता तर मला इथून जायलाच हवे!” जोई मनाशी म्हणाला.



त्याने दप्तरातून उडी मारली.

“अरे! हे पहा!” एक मुलगा ओरडला.

“कांगारू! कांगारूचं पिल्लू!”



जोईने दाराबाहेर उडी मारली.

“ए, परत ये!” मुले ओरडू लागली.

आणि मुली म्हणाल्या,

“कांगारू, अरे परत ये!”



पण जोई निघून गेला.

त्याला स्वस्थ बसायचं नव्हतं.




हॉप

हॉप

उडी मारून जोई

मोठ्या झाडाखाली गेला.



तिथे त्याला दिसली एक ट्रक.

ती एका झाडा शेजारी उभी होती.

“बरं झालं!” जोई म्हणाला.

मला एक खिसा दिसतोय!”

हॉप

हॉप

जोईने त्या खिशात उडी मारली.

ट्रक चालायला लागली.

धड धड धड

हे छान होते.

पण तो खिसा मात्र मऊ नव्हता.





“हे काय आहे?” जोई म्हणाला.

हे मला नको आहे”

जोई काय करतो आहे

हे पोस्टमनला माहीतच नव्हते.

पण एका शेतकऱ्याने ते पाहिले.

त्याच्या बायकोने पण पाहिले.





“आणि हे काय?” जोई म्हणाला.

“मला हे नको आहे.

हे पण नको

आणि ते पण नको!”

ट्रक आपली पुढे जातच होती.



शेतकरी ट्रक मागे पळू लागला.

शेतकऱ्याची बायको

शेतकऱ्याच्या मागे पळू लागली.

“हे बघा! हे बघा!”

त्यांनी पोस्टमनला हाका मारल्या.



जोईला शेतकऱ्याची बायको दिसली.

त्याला तिच्या खिशात

परत जायचे नव्हते.



हॉप!

उडी मारून जोई झाडाखाली

आणि गवतावर परत गेला.



“मला आता खिसा पाहिजे,” जोईला रडू आलं.

“मला आता उबदार आणि मऊ खिसा पाहिजे

त्यात माझ्याशिवाय दुसरं काही नको.”

गवतावर जोईला

काही कांगारू दिसले.



मग त्याला त्याची आई दिसली!

"जोई! जोई!" आईने हाक मारली.

"अरे, कुठे गेला होतास?"

"मी जग बघायला गेलो होतो,"

जोई हळूच म्हणाला.

"असं का?

मग जग कसं होतं ?" आईने विचारले.

"तसं पाहिलं तर जगात खूप खिसे होते.

त्या सगळ्या खिशांमध्ये खूप सामान होतं.

पण माझ्या एकट्यासाठीच जागा असलेला

एकही खिसा जगात नाही आहे." जोई म्हणाला.





“जगातला सगळ्यात मस्त खिसा

फक्त इथेच आहे,” जोईने उत्तर दिले.

“मग ये, आत उडी मार,” आई म्हणाली.

जोईने अगदी तेच केले.

समाप्त



